**किरकोळ फौजदारी अर्ज क्र. ६८/२०२६ निशाणी क्र.१ खालील आदेश**
**खुरेशी आयुब इतर वि शासन**
**[CNR NO.MHBI0900-0410-2026]**

-

१. अर्जदार खुरेशी आय्युब रतनजी याने प्रस्तुतचा अर्ज भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम ५०३ अन्वये प्रस्तुत गुन्हयामध्ये जप्त करण्यात आलेला मुद्देमाल म्हणजे अर्जदाराची Honda कंपनीची Unicorn वाहन जिचा नोंदणी कं. एम.एच.१२—एच.के.५७८५, चेचीस क्र. ME4KC09CJB8146468 व इंजिन क्र. KC09E6151758 असा असून ती परत मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. अर्जदारांचे कथन आहे की, त्यांचे वर नमुद वाहन हे माजलगाव शहर पोलीसांनी अपराध क्र—१७/२०२६ मध्ये जप्त केलेले आहे. सदर वाहनाचे अर्जदार हे मालक आहेत. अर्जदाराने सदर वाहन त्यांना परत मिळावे म्हणुन विनंती केलेली आहे.

३. सहाय्यक सरकारी अभियोक्ता व तपासीक अंमलदार यांनी आक्षेप घेवुन सदर अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

४. दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकला. अर्जदार यांनी नि.क्र.४ सोबत वाहनाचे आर.सी.बुक ची प्रत, अर्जदाराची आधारकार्ड प्रत, एफ.आय.आर.प्रत व इन्श्युरन्स पॉलीसीची प्रत दाखल केली आहे.

५. सदर कामी नि.क्र.४ येथे दाखल केलेल्या वाहनाच्या नोंदणी प्रतीचे अवलोकन केले असता वाहन मालक म्हणुन अर्जदारच्या नावाची नोंद असल्याचे दिसुन येत आहे. सदर प्रकरणाचा निकाल लागण्यास काही कालावधी जाणार आहे. सदर प्रकरणामध्ये असे दिसून येते की, गुन्हा घडल्याच्या अनुषंगाने जप्त करण्यात आलेला मुद्देमाल हा अर्जदार यांचा आहे. मुद्देमालाचा ताबा अधिकार हा सकृतदर्शनी सदर अर्जदार यांचा आहे असे दिसुन येते. सदर प्रकरणातील मुद्देमालाचा विचार करता सदर मुद्देमाल हे एक प्रकारचे वाहन आहे. त्याच्यावर हवामानाचा परिणाम होणार आहे. सदर वाहन पोलीस स्टेशनमध्ये पडुन राहील्यास त्याचा काहीही उपयोग होणार नाही. सदर प्रकरणाचा अंतिम निकाल लागेपर्यंत सदर जप्त मुद्देमाल अर्जदार याच्या ताब्यात देणे योग्य होईल. वरील कारणांचा विचार करून खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**: आदेश :**

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. प्रस्तुत प्रकरणातील जप्त मुद्देमाल म्हणजेच अर्जदाराची Honda कंपनीची

Unicorn वाहन जिचा नोंदणी क्रं. एम.एच.१२–एच.के.५७८५, चेचीस क्र. ME4KC09CJB8146468 व इंजिन क्र. KC09E6151758 ही सदर प्रकरणाचा अंतिम निकाल लागेपर्यंत अर्जदार यांना खालील अटी व शर्तीवर परत करण्यात येतो–

३. अ) अर्जदार यांनी न्यायालयाने आदेश दिल्यास जप्त मुद्देमाल न्यायालयात हजर करणे बाबत प्रत्येकी रक्कम **रु.५०,०००/– (अक्षरी पन्नास हजार रू. मात्र)** चे बंधपत्र दयावे.

ब) अर्जदार यांनी जप्त मुद्देमालात कोणत्याही प्रकारे बदल करू नये अथवा विल्हेवाट लावु नये, तसेच कोणासही कोणत्याही प्रकारे तबदील करु नये.

क) अर्जदार यांनी सदर वाहन तपासी अधिकारी व न्यायालयाने मागणी केली असता सादर करावे.

ड) तपासी अंमलदार यांनी जप्त मुद्देमालाचे छायाचित्रे काढुन अर्जदारासमोर पंचनामा करून सदर कागदपत्रे दोषरोप पत्रासोबत न्यायालयात दाखल करावीत.

इ) अर्जदार याने सदर वाहन वापरुन पुढे कोणताही गुन्हा करु नये. अथवा कोणताही गुन्हा करण्यास सदर वाहन कोणालाही देउ नये.

Digitally signed by GANESH SURESHAPPA KHUPSE
Date: 2026.03.18 17:35:29 +0530

माजलगाव
दिनांक : १८/०३/२०२६.

**( जी.एस.खुपसे )**
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,(कोर्ट क्र. २)
माजलगाव.

**CERTIFICATE**

"I affirm that the contents of this PDF file are word to word as per original Judgment/order".

Dictated, transcribed, Checked & signed on : 18-03-2026

Sd/-

Date: 18-03-2026

R.M.Shaikh
Gr-III Stenographer
2nd Jt. Civil Court J.D.Majalgaon